# हॉकी खेळामुळे देशसेवा करण्याची संधी मिळाली
## - हॉकीचा जादुगार पदमश्री धनराज पिल्ले

पनवेल (प्रतिनिधी) फक्त नोकरी आणि पैसा मिळविणे हाच एकमेव उद्देश न ठेवता इतरांपेक्षा काहीतरी वेगळे करायचे होते, म्हणून हॉकी खेळाकडे वळलो आणि कोणत्याही सुखसोयी नसतानाही हॉकीच्या माध्यमातून देशाची सेवा करण्याची संधी मला मिळाली, असे प्रतिपादन हॉकीचा जादुगार पदमश्री धनराज पिल्ले यांनी शुक्रवारी पनवेल येथे केले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्यावतीने आणि ॲम्युचर कबडडी फेडरेशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य कबडडी असोसिएशन व रायगड जिल्हा कबडडी असोसिएशन यांच्या मान्यतेने खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर महाविद्यालयाच्या भव्य किडांगणावर (लोकनेते दि. बा. पाटील किडानगरीत) २९ मे पासून सुरू झालेल्या अखिल भारतीय स्तरावरील 'राजीव गांधी सुवर्ण चषक कबडडी स्पर्धा २०१४' या स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी कबडडीपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी पिल्ले उपस्थित होते. त्यावेळी पिल्ले पुढे म्हणाले की, मेहनत, सराव आणि एकाग्रता यांच्या जोरावर मी इथवर पोहोचलो. याचे संपूर्ण श्रेय माझ्या आईवडिलांनाच जाते, असे सांगून मेहनत आणि प्रामाणिकपणाने चांगला खेळ खेळून देशाचे प्रतिनिधीत्व करा आणि स्पर्धेत यशस्वी होवून आपल्या आई वडिलांसह देशाचेही नाव अधिक उज्ज्वल करा, अशा शुभेच्छाही त्यांनी यावेळी किडापटूंना दिल्या. हॉकी खेळायला मला जितके आवडते त्याहीपेक्षा कबडडीचा मर्दानी खेळ पहायला मला खूप आवडतो, असेही त्यांनी यावेळी आवर्जुन नमूद केले. तसेच कबडडी या खेळाला राजाश्रय मिळवून देण्यासाठी व कबडडीच्या प्रचारासाठी राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करीत असल्याबद्दल त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांना धन्यवाद दिले.

यावेळी रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष तथा आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरूणशेठ भगत, शिक्षण मंडळाचे सभापती वाय. टी. देशमुख, अर्जुन पुरस्कार विजेते शांताराम जाधव, माया अत्रे, अशोक शिंदे यांच्यासह पनवेलचे गटविकास अधिकारी राजेंद्र पाटील, पनवेल शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष जयंत पगडे, मुरबाड पंचायत समिती सदस्य वसंत गायकर, रायगड जिल्हा कबडडी असोसिएशनचे माजी अध्यक्ष नथुराम पाटील, आयोजन समिती सचिव शरद कदम, मुंबई कबडडी असोसिएशनचे कार्याध्यक्ष लक्ष्मण कांदळगावकर, नवी मुंबई कबडडी असोसिएशनचे सुधाकर घाग, सुरेश मोरे, राजेश पडळ, युवा किडापटू अक्षय टेंबे, तालुका कॉंग्रेसचे उपाध्यक्ष के. ए. म्हात्रे, सुपसिध्द निवेदक राणा प्रताप तिवारी, समालोचक मिलिंद पाटील, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा नेते हॅप्पी सिंग आदींसह कीडा रसिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## राजीव गांधी सुवर्ण चषक अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा
## भारतीय नौदल, सीआयएसएफ उपांत्यपूर्व फेरीत

भारतीय नौदल (मुंबई) आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ) या संघानी राजीव गांधी सुवर्ण चषक अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली. दोन्ही संघांनी आपल्या गटामध्ये दुसऱ्या विजयाची नोंद केली. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने आयोजित केलेल्या या स्पर्धेत बलाढय भारत पेट्रोलियमने विजयाने सुरूवात केली. त्यांनी महिंद्र महिंद्रवर पुन्हा एकदा शक्तीप्रदर्शन करताना महाराष्ट्र राज्य पोलिसांना सुरूवातीच्या पिछाडीनंतर मध्यंतराला १६-१४ आघाडी घेत शेवटी ही लढत ३३-३८ अशी जिंकली. सीआयएसएफ ने ही एका विश्वास पूर्वक विजयाची नोंद करताना एका गतिमान लढतीमध्ये दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूरवर तीन लोण चढविले. त्यांनी ४८-३० अशी ही लढत जिंकली. एअर इंडियानेही हिमाचलचा अपेक्षेनुसार ३२-१७ असा पराभव केला.

नौदलाच्या विजयामध्ये नितिन तोमर आणि कुलदिप यांच्या चढाया निर्णायक ठरल्या. या दोघांनी एका चढाईत ३ गडी टिपण्याचा पराक्रम केला. पोलीसांची आक्रमणेही चांगली झाली. महेंद्र राजपुत आणि मंगेश भगत यांच्या पकडी झाल्याने पोलीसांना हार पत्करावी लागली. नौदलाच्या डी राठीच्या पकडींनी प्रेक्षकांची वाहवा मिळविली. एका अन्य सामन्यात उत्तर प्रदेश पोलीसानी राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलायझर्सचा ३३-१७ असा पाडाव केला. विजयी संघाचे विनित कुमार, कुलदिप सिंग तर पराभूत संघाचा संदेश बैकर आणि संदीप भट यांनी चमक दाखविली. संदेशाने चांगली आक्रमणे केली. सहा फुट उंच आणि २० वर्षे वयाच्या संदेशाने एकदा ३ तर आणखी एकदा २ गडी टिपण्यात यश मिळविले. महिंद्रच्या निलेश तावडेनेही असाच ३ प्रतिस्पर्धा टिपण्याचा पराक्रम केला. मात्र भारत पेट्रोलियमच्या शैलेश सावंत आणि आशिम म्हात्रे यांनी आपल्या संघाची नैया पार केली. महिला विभागामध्ये विजेतेपदाचे दावेदार पालम स्पोर्टस्ने अमर हिंदचा ३८-१४ असा फडशा पाडला. ज्योती आणि मानसी यांना रोखणे अमर हिंदला जमले नाही. पंजाबी विद्यापीठ (कर्नाटक) यांनी शिवशक्तीला १३-१० असा पराभूत केले.